# विश्व पांथस्थ


अनिवासी भारतीयांसाठी पहिले मराठी मासिक VISHWA PANTHASTHA

वर्ष : १ । अंक : २ । एप्रिल २०१८ (मासिक) । मूल्य ₹ १०० । AED 10 । US$ 2 www.panthastha.com




# शिक्षणाचे वारे... की वाऱ्यावर शिक्षण

आम्हा घरी धन... शब्दाचीच रत्ने

पुस्तकांचं गाव

# तुम्ही पांथस्थ मध्ये सहभागी आहात का?
# पांथस्थ मध्ये तुम्ही सहभागी होऊ शकता.

तुम्ही यु ए ई, ओमान, कतार, बहरीन, सौदी, कुवेत, कॅनडा, जपान, भारतात कुठेही, अमेरिका, युरोप, रशिया, आफ्रिका या ठिकाणी राहत असाल तर पांथस्थ मध्ये लिखाण करू शकता, जाहिरात देऊ शकता, किंवा तुमच्या शहरात पांथस्थ चा संपर्क म्हणून काम करू शकता. जाहिराती व वार्षिक वर्गणी जमा करू शकता.

पांथस्थ मध्ये कुठल्या विषयावर लिहावे याबद्दल विचारणा होत आहे. म्हणून काही सूचना.

अनिवासी भारतीयांची, विशेतः आखाती मराठी भारतीयांची गरज म्हणजे प्रथम आखातात चांगली नोकरी शोधणे किंवा असलेली नोकरी बदलून दुसरी चांगली नोकरी बघणे, आखातात व्यवसाय धंदा करण्यासाठी माहिती व मार्गदर्शन मिळवणे, गावाकडे लक्ष देणे व घर घेणे, मुलांचे शिक्षण, सुट्टीत पर्यटन, आरोग्यविषयक सोयी सुविधा व सल्ला, डॉक्टरांची माहिती, करमणुकीचे व सांस्कृतिक कार्याक्रमाविषयी माहिती, सामाजिक उपक्रमाविषयी माहिती व त्यात सामील होण्याची संधी, या सर्व विषयांवर तुम्ही लिहू शकता. किंबहुना तुम्हीच लिहावे हि अपेक्षा.

पांथस्थ हजारो वाचकापर्यंत पोहोचणार आहे, तेव्हा हि संधी साधून तुम्ही तुमच्या व्यवसायाची, धंद्याची, उपक्रमाची, प्रोडक्ट्स, सर्विसेस, याची माहिती सर्वांपर्यंत पोहोवण्यासाठी छानशी जाहिरात देऊ शकता. जाहिरात तयार नसेल तर आम्ही ती तयार (डीझाईन) करण्यास मदत करू. तुमच्या व्यवसायाची जाहिरात प्रथम तुम्हीच केली पाहिजे. जे दिसते ते खपते हे लक्षात ठेवा.

आपल्या आसपास असलेल्या उद्योगाची व उद्योजकाची माहिती द्या. उद्योजकांनीदेखील स्वताहून पुढाकार घेऊन आपल्या उद्योगाची माहिती द्यावी. (मुलाखत चालेल).

आखातात आहात, येण्याची इच्छा आहे, तेव्हा नेट वर्किंग करा, धन्देकी कुछ बात करो, कुछ पैसा जोडो.

परदेशात राहणाऱ्या भारतीयांची अजून एक समस्या म्हणजे त्यांना आपल्या मुलांसाठी किंवा मुलींसाठी योग्य स्थळ शोधण्यास अडचण येते. माहितीच मिळत नाही. यावर उपाय एकच. उपवर मुला / मुलींची माहिती द्या, त्यासाठी विशेष सेक्शन पांथस्थ मासिकात असेल.

तुम्हाला नोकरी हवी असेल किंवा असलेली नोकरी बदलायची असेल तरी पांथस्थ मध्ये छोटी जाहिरात द्या. तुमच्या कंपनीत तुम्हाला योग्य उमेदवार नोकरीसाठी हवा असेल तरी छोटी जाहिरात द्या.

कविता, मराठी गझल हि जरूर पाठवा.

तुम्ही ज्या ठिकाणी राहता आहात, त्याच्या आसपास चे प्रेक्षणीय स्थळे, सुट्टीसाठी कुठे जावे या बद्दल सूचना यावर लेख पाठवा. फोटो पाठवा. (माहिती बरोबर).

मुलांसाठी काही चांगले कोर्सेस, मुलांसाठी काही साहित्य, लिखाण पाठवा.

पैश्याचे नियोजन, कुठे वाचवावे, कुठे खर्च करावे यावर लिहा.

भारतातील सी ए (CA) नी संपर्क साधावा, NRI (विशेषतः आखातातील मराठी माणसासाठी) काही विशेष सेवा, सूचना असेल तर त्यावर लिहावे. (जाहिरात दिली तरी चालेल).

विविध (बिल्डर्स) बांधकाम व्यावसायिक यांच्या गृहयोजना चालू आहेत. त्यांनी पांथस्थ मध्ये जाहिरात व लेख दिला तर उत्तम.

भारतात (किंवा परदेशात) भारतीयांसाठी असलेल्या राहण्याच्या सोयी (बेड व ब्रेकफास्ट), पेईंग गेस्ट याबद्दल माहिती (जाहिरात) द्या.

विविध मराठी ग्रुप्स आहेत, त्यांनी आपल्या ग्रुप संबंधी माहिती द्या, उपक्रमांची माहिती द्या.

आपल्याला किंवा आपल्या ओळखीत कोणाला काही पुरस्कार मिळाला असेल किंवा काही चांगली उपलब्धता असेल तर त्याबद्दल लिहा.

तुम्हाला आलेला चांगला किंवा वाईट अनुभव सर्वांबरोबर शेअर करा, त्याबद्दल लिहा.

तुमच्या आसपास कुठला चांगला सामाजिक उपक्रम चालू असेल त्याबद्दल व त्यासाठी मदतीची गरज असेल, तर त्या बद्दल लिहा.

पांथस्थ मासिकाचे वितरण संपूर्ण जगभर करण्याचा प्रयत्न आहे, आपले सहकार्य अपेक्षित आहे. तुम्ही तुमच्या मंडळाची, ग्रुपची, कंपनीची, उपक्रमाची जर स्मरणिका काढणार असाल तर त्यासाठी पांथस्थ मदत करेल. जमल्यास विशेष अंक देखील प्रकाशित करता येईल.

लेखकांसाठी: मराठी टाइप करता येत नसेल तर हाताने लिहून (स्कॅन करून) लेख पाठवला तरी चालेल. तुम्हाला काही विशेष सूचना करायच्या असतील तर त्याचे स्वागतच आहे.

ई मेल editor panthastha .com

विश्व पांथस्थ

# अनुक्रमणिका


- संपादकीय ........................................................ ४
- भिलार–पुस्तकांचं गाव ........................................ ६
- प्रधानमंत्री कौशल विकास योजना .......................... ९
- कुरुक्षेत्र! ...................................................... १०
- एमिरेटस् एअरलाईन फेस्टिव्हल ............................ १२
- कविता ............................................................ १४


विश्व पांथस्थ


**विश्व पांथस्थ**
वर्ष १, अंक २
एप्रिल २०१८

अनिवासी भारतीयांसाठीचे पहिले मराठी मासिक

संपादक
**संदीप वसंतराव कडवे**
कार्यकारी संपादक
**रवींद्र गुर्जर**

वितरण साहाय्य
**राजन तावडे**, अबू धाबी
**गजानन खोलगडे**, बहरीन
**धवल नांदेडकर**, फुजेरा
**वीरभद्र कारेगावकर**, अजमान

मुखपृष्ठ आणि सजावट
**मंदार प्रिंटर्स, पुणे**

**मूल्य : ₹100 | AED 10 | US$ 2**

**Vishwa Panthastha**
Year 1, Issue 2
April, 2018

First Marathi Monthly For NRI Maharashtrians

Editor
**Sandeep Vasantrao Kadwe**
Managing Editor
**Ravindra Gurjar**

Distribution Support
**Rajan Tawde,** Abu Dhabi
**Gajanan Kholgade,** Bahrain
**Dhawal Nandedkar,** Fujerah
**Veerbhadra Karegaonkar,** Ajman

Cover & Design
**Mandar Printers, Pune**

**Price : ₹. 100 | AED 10 | US$ 2**

विश्व पांथस्थ हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक संदीप वसंतराव कडवे यांनी ए–७०३, निसर्ग सिटी–२, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे – ४११०५७ येथे प्रसिद्ध केले.
**संपादक – संदीप वसंतराव कडवे**
(पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी)

'Vishwa Panthastha' monthly publication is owned, printed & published by Sandeep Vasantrao Kadwe, and published at A-703, Nisarg City-2, Kaspate Vasti, Wakad, Pune - 411 057.
**Editor - Sandeep Vasantrao Kadwe**
(Responsible for Selection of News & Articles under the PRB Act.)



**या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.**

विश्व पांथस्थ

## संपादकीय

# शिक्षणाचे वारे की वाऱ्यावर शिक्षण





भारतातील ६५% नागरिकांचे सरासरी वय ३५ पेक्षा कमी आहे. म्हणजे युवापिढीची लोकसंख्या ७० करोड पेक्षा जास्त आहे. देशात साधारण ४,००० इंजिनिअरिंग कॉलेजेस मधून १५ लाख इंजिनिअर दरवर्षी बाहेर पडतात, त्यातील केवळ १०% ते १५% नोकरी मिळण्याच्या पात्रतेचे असतात असे रिसर्च सांगतो. इंडियन मेडिकल असोशिएशनच्या २०१६ च्या विधानानुसार भारतात २,००,००० पेक्षा जास्त बेरोजगार डॉक्टर्स आहेत जे ग्रामीण भागात जाऊन सेवा पुरवू शकतात. विरोधाभास म्हणजे भारतात ५,००,००० डॉक्टर्स ची तातडीची गरज आहे, पण तेवढे डॉक्टर्स सरकारी कॉलेजमधून तयारच होत नाहीत. वर्षात साधारण केवळ ६०,००० डॉक्टर्स भारतात तयार होतात. खासगी कॉलेज–मध्ये एका डॉक्टरला शिक्षणासाठी साधारण ५० लाखापासून पुढे ४–५ करोडपर्यंत खर्च येतो जे मध्यम वर्गीय हुशार मुलांच्या ऐपतीपलीकडे आहे. इतर अनेक प्रकारच्या तंत्रशिक्षित किंवा बाकी शाखेतील पदविधारकांची उद्योग व्यवसायाला गरज आहे, परंतु कॉलेजमधून बाहेर पडून त्यांना थेट लागलीच नोकरी मिळेल अशी परिस्थिती नाही. स्किल इंडिया, स्टार्ट अप इंडिया या योजनांची अंमलबजावणी यथातथाच आहे.

**भारतात ५,००,००० डॉक्टर्सची तातडीची गरज आहे, पण तेवढे डॉक्टर्स सरकारी कॉलेजमधून तयारच होत नाहीत. वर्षात साधारण केवळ ६०,००० डॉक्टर्स भारतात तयार होतात. खासगी कॉलेजमध्ये एका डॉक्टरला शिक्षणासाठी साधारण ५० लाखापासून पुढे ४–५ करोडपर्यंत खर्च येतो, जे मध्यमवर्गीय हुशार मुलांच्या ऐपतीपलीकडे आहे.**

२०१८ च्या नवीन शैक्षणिक वर्षास नुकतीच सुरवात होत आहे. शिक्षणाचे वारे कुठल्या दिशेने वाहत आहेत ते फारच ठळकपणे समोर येत आहे. सीबीएसई च्या पेपरफुटीमुळे अगोदरच मंडळाची लक्तरे वेशीवर टांगली गेली आहेत. विद्यापीठांचे निकाल वेळेवर लागत नाही, त्यामुळे परीक्षा या अजस्त्र तंत्राचा बोजवारा उडाला आहे. शिक्षक कमी पगार मिळतो किंवा मिळतच नाही म्हणून संपावर जाण्याच्या धमक्या देताहेत किंवा संप करत आहेत. जे संप करू शकत नाहीत, धनदांडग्या शिक्षण सम्राटांना आव्हान देऊ शकत नाही, ते निराशेपोटी पाट्या टाकत आयुष्य काढत आहेत. कुठे सोयीची नोकरी मिळत नाही म्हणून नाईलाजाने शिक्षक, प्राध्यापक होणाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. ज्यांना आपल्या दर्जामुळे, व्यापारी कौशल्यामुळे शिक्षणाचा बाजार मांडून ट्युशन क्लासेस सुरु करता येतात ते अनियंत्रित अनिर्बंध शिक्षणाचा बाजार मांडताहेत. शिक्षणाचा दर्जा त्यामुळे खालावत आहे. पालक न परवडणारी फी देऊन कमी प्रतीच्या शिक्षणाच्या नावाने ओरडताहेत. मुले/मुली सो कॉल्ड टेक्नोलॉजी क्रांतीमुळे फळाला आलेल्या सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे व नवीन आयकॉन समोर दिसत नसल्याने भरकटत आहेत. उठसुठ कुठल्याही सेलेब्रिटीला आदर्श ठरवले जात आहे व त्याच वेगाने त्याच आदर्शाला त्वरेने अडगळीत टाकले जात आहे.

टेक्नोलॉजीचा वापर करून जरूर काही चांगले प्रकल्प उभे राहत आहेत, पण त्यांना मूळ प्रवाहात त्याच तडफेने, अधिकाराने सामावून घेतले जात नाही असे दिसते. दरवर्षी लाखाच्या संख्येने सर्व प्रतीचे तथाकथित इंजिनिअर, डॉक्टर बहुतांशी कालबाह्य ज्ञान, शून्य अनुभव घेऊन नोकऱ्यांच्या बाजारात येऊन वणवण भटकत आहेत. UPSC / MPSC च्या करोडो रुपयांच्या मार्केटच्या मृगजळाचा पाठलाग उच्चशिक्षित युवावर्ग करतो आहे आणि काही दिवसांनी निराश व हतबल होऊन मिळेल ती नोकरी शोधत आहे. आधीच IAS, IPS झालेले बहुसंख्य जणू काही आता जन्मभर आम्हाला झेला, आम्हाला कोण आता हात लावतो बघतो, या वृत्तीने ओरबडण्यात गुंतले आहेत. डॉक्टर बनण्यात तारुण्याची १० वर्षे व काही करोड रुपये घालवल्यानंतर बाहेर पडलेले सुपर स्पेशालिस्ट डॉक्टर आता

लवकरात लवकर घालवलेले पैसे वसूल कसे करता येतील याच्या चिंतेत आहेत. स्वतः उद्योग सुरु करता येईल इतपत भांडवल शिक्षण संपेपर्यंत यांच्या किंवा पालकांच्या हातात शिल्लकच रहात नाही. हे काहीच न करू शकलेले इंजिनिअर डॉक्टर द्विपदवीधर बनून कॉलसेंटरच्या वातानुकूलित खुराड्यात असंख्य होतकरू तरुणपणाची उमेदीची वर्षे वाया घालवत आहेत. विद्यापीठांच्या कुलगुरूंना, प्राचार्यांना, प्राध्यापकांना आपली खुर्ची व नोकरी सांभाळण्यासाठी नको नको त्या लोकांची हांजी हांजी करावी लागत आहे. शिक्षणसम्राट शेकडो एकर जमिनीवर करोडोच्या इमारती उभ्या करतांना पायात असंख्य विद्यार्थ्यांचा, शिक्षकांचा बळी देताहेत. पुढाऱ्यांचे डोके या विस्कटलेल्या भरकटलेल्या तरुणांचा आपल्याला निवडणूक जिंकण्यासाठी व आपले उद्योग चालवण्यासाठी कसा उपयोग करून घेता येईल या दिशेने काम करतेय. सरकारच्या रोजगार निर्मिती प्रकल्पातून कोणाला रोजगार मिळाला हा संशोधनाचा विषय होऊ पाहत आहे. असंख्य बँकांना लुटून काही महान उद्योजक लुटारूंनी पोबारा केल्याने दिवाळखोरीत निघालेल्या बँका नवतरुण उद्योजकांना कर्ज देण्यास असमर्थता दाखवत आहेत. असा सगळा आनंदी आनंद आहे.

शिक्षणाचे वारे कुठल्या दिशेने जात आहेत, ते आताही दिसतेय व अजून काही वर्षांनी याची भीषणता अजून जाणवेल असे दिसते. मध्यमवर्गीय पालकांना दोन मुलांच्या शिक्षणावर १०+२+४+(२) या सोळा अठरा वर्षात सर्वसाधारण कमीत कमी ३२ लाख व जास्तीत जास्त ५ – ७ करोड रुपये खर्च करावे लागतात. मग त्यातून ही पिढी स्वतःच्या पायावर उभी राहते का? शिक्षित पिढी सुशिक्षित होते आहे का? समर्थ होते आहे का? या पिढीमध्ये निर्मितीक्षमता आहे का? सृजनशीलता असेलच तर त्याला सुरवातीपासून तसा वाव मिळतो का किंवा दिला जातो का? समाजात अशा सृजनशील, निर्मितीक्षम पिढीला सन्मान व धन मिळते का? आज समाजात दिसणारा धनिक हा आजच्या उच्चशिक्षित असणाऱ्या तरुणापेक्षा मानाने, धनाने अधिक मोठा असेल तर तो या शिक्षणाचा अपमान समजायचा का? उच्चशिक्षित होऊन केवळ लुटणे हाच एककलमी कार्यक्रम राबवणाऱ्या अधिकारी वर्गाने याच समाजाचा व शिक्षणाचा अपमान केला असे समजायचे का? प्रचंड मेहनत करून महागडे शिक्षण घेऊन जेव्हा नोकरीच्या बाजारात ही तरुण पिढी येते व रिक्षावाल्यापेक्षा किंवा चहावाल्यापेक्षा कमी कमवते तेव्हा तो त्याच्या पालकांच्या आयुष्यभराच्या कष्टाचा, तरुणांच्या शिक्षणाचा व समाजाच्या विश्वासाचा प्रचंड अपमान समजायचा का?


हा प्रश्न जेवढा भारतात राहणाऱ्या जनतेचा आहे तेवढाच किंवा त्याहीपेक्षा जास्त भारताबाहेर राहणाऱ्या अनिवासी भारतीयांचा देखील आहे. त्यांची आर्थिक गुंतवणूक व भविष्याबद्दल संदिग्धता कदाचित भारतात राहणाऱ्या पालकांपेक्षा जास्तच असेल. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे खरे तर शिक्षणाचा खर्च कमी व्हायला हवा, शिक्षण अधिक समाजाभिमुख, उद्योगाभिमुख, निर्मितीक्षम व्हायला हवे. पण हे कायदे, नीती करण्याची क्षमता व अधिकार ज्यांच्या हातात आहे, त्यांची धृती, सदसद्विवेकबुद्धी, नीतिमत्ता व संवेदनशीलता किती जागृत आहे, हा देखील यक्षप्रश्न आहे. त्याची ही धृती लवकरात लवकर जागृत होवो व सध्या वाऱ्यावर असलेल्या शैक्षणिक क्षेत्राचे वारे योग्य दिशेने वाहू लागो, हीच नवीन शैक्षणिक वर्षाच्या निमित्ताने सर्व सृजनशील पालकांना, विद्यार्थ्यांना, शिक्षकांना, समाजातील विचारवंतांना सदिच्छा!

– डॉ. संदीप कडवे, ६ एप्रिल, २०१८

# श्रीदासबोध – दशक पाच – समास ५

## ।। बहुधाज्ञान निरूपण ।।

**समर्थ रामदास**



जव ते ज्ञान नाही प्रांजळ। तव सर्व काही निर्फळ।
ज्ञानरहित तळमळ। जाणार नाही।।
बहुत केले विद्यापठण। संगीतशास्त्र रागज्ञान।
वैदिक शास्त्र वेदाधेन। हे हि ज्ञान नव्हे।।
नाना शब्दांची परीक्षा। नाना अर्थांची परीक्षा।
नाना भाषांची परीक्षा। हे ज्ञान नव्हे।।
नाना लाघवे चित्रकळा। नाना वाद्य संगीतकळा।
नाना प्रकारे विचित्र कळा। हे ज्ञान नव्हे।।
आदिकरूनि चौसष्टि कला। याहि वेगळ्या नाना कळा।
चौदा विद्या सिद्धी सकळा। हे ज्ञान नव्हे।।
जाणावे दुसऱ्याचे जीवीचे। हे ज्ञान वाटे साचे।
परंतु हे आत्मज्ञानाचे। लक्षण नव्हे।।
ऐसी जाणे अंतरस्थिती। तयासि परम ज्ञाता म्हणती।
परंतु जेणे मोक्षप्राप्ती। ते हे ज्ञान नव्हे।।

**१४ विद्या आणि ६४ कलांसह अगणित विषयांचे ज्ञान मानव प्राप्त करून घेतो. संसार-सागर तरून जाणे आणि जीवन सुखकर होणे, यांसाठी त्यांची आवश्यकता आहेच. परंतु, ती सर्व साधने आहेत हे ध्यानात ठेवले पाहिजे. खरे ज्ञान म्हणजे आत्मज्ञानच ! ते प्राप्त करून घेणे, हेच प्रत्येक व्यक्तीचे ध्येय असले पाहिजे. अधिकारी लोकांच्या मार्गदर्शनाने, आपली वाटचाल त्याच दिशेने असावी. एक ना एक दिवस लक्ष्यप्राप्ती होणारच!**



आम्हा घरी धन...शब्दांचीच रत्ने

पुस्तकांचं गाव

# भिलार पुस्तकांचं गाव : एक अनोखा प्रकल्प

– प्रा. आनंद काटीकर

महाराष्ट्रात वाचनसंस्कृतीचा विकास करण्यासाठी – पर्यायाने मराठी साहित्याचा आणि भाषेचा विकास साधण्यासाठी महाराष्ट्र शासन गांभीर्याने प्रयत्न करीत आहे. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन (दि. १५ ऑक्टोबर) 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करणे, शासकीय विभागांच्या विविध कार्यक्रमांमध्ये पुष्पगुच्छांऐवजी पुस्तकं भेट देणे आदी अनेक अभिनव उपक्रम कार्यान्वित झाले आहेत. 'पुस्तकांचं गाव' हा प्रकल्पही ह्या प्रयत्नांची पुढची पायरी आहे. वाचनसंस्कृती संवर्धनाच्या माध्यमातून सजग, संवेदनशील आणि समर्थ समाजाची पायाभरणी करण्याची क्षमता असलेल्या या प्रकल्पाची ही थोडक्यात ओळख.

### संकल्पना

काही वर्षांपूर्वी आज महाराष्ट्राचे मराठी भाषा मंत्री असणारे श्री. विनोद तावडे एक पर्यटक म्हणून सहकुटुंब इंग्लंडला गेले होते. त्या वेळी वेल्स प्रांतामध्ये असलेले 'हे ऑन वे' नावाचं गाव पाहण्याची संधी त्यांना मिळाली. ते पुस्तकांचं गाव होतं. पुस्तकांनी भरलेली मोठी दुकानं तिथे होती. पुस्तकं पाहण्यासाठी आणि खरेदी करण्यासाठी हजारो पर्यटक जगभरातून आले होते. लाखो पुस्तकं आणि त्यात वावरणारे हजारो पुस्तकप्रेमी असं ते दृश्य होतं. तिथे फिरत असताना, आपल्या महाराष्ट्रात असं 'पुस्तकांचं गाव' उभं करायचं; असं मनोमन ठरवूनच श्री. विनोद तावडे भारतात परतले.



भारतात परत आल्यावर त्यांनी अनेकांना 'पुस्तकांच्या गावा'ची संकल्पना सांगितली. तसं गाव महाराष्ट्रात साकारलं जावं हे आपलं स्वप्नही बोलून दाखवत होते. सगळ्यांनाच ही संकल्पना आवडली होती. पण हे स्वप्न पूर्ण कसं होणार हा मात्र प्रश्न होता. व्यासंगी संपादक डॉ. अरुण टिकेकरांनीही 'हे ऑन वे' पाहिलेलं होतं. तिथे उपलब्ध असलेली अनेक दुर्मिळ पुस्तकं पाहून ते थक्क झाले होते. त्या गावात फिरत असतानाच त्यांनी बदलापूरच्या श्याम जोशी यांना फोन केला होता. 'आपण जणू स्वर्गात असल्याचा भास होतो आहे' अशी भावना त्यांनी व्यक्त केली होती. पुस्तकांच्या गावाविषयी टिकेकरांसारख्या ज्येष्ठ ग्रंथप्रेमींशी, तत्कालीन शासनातल्या अधिकाऱ्यांशी आणि मंत्र्यांशीही तावडे यांनी चर्चा केली. पण तेव्हा ते सत्ताधारी नसल्यामुळे कल्पना मांडण्यापलीकडे फारसं काही करता येत नव्हतं. अर्थात 'महाराष्ट्रात पुस्तकांचं गाव असावं' हे स्वप्न मात्र त्यांचा पिच्छा सोडत नव्हतं.

योगायोग असा, की पुढे विनोद तावडेंकडेच मराठी भाषा हे खाते आले आणि स्वप्नपूर्तीची संधी चालून आली. मंत्री झाल्यानंतरच्या पहिल्याच 'मराठी भाषा गौरव दिना'ला (दि. २७ फेब्रुवारी, २०१५) त्यांनी 'पुस्तकांच्या गावा'ची घोषणा केली. या घोषणेलाही समाजाच्या सर्व स्तरांतून उत्तम प्रतिसाद मिळाला. पण शासनातली कोणतीही घोषणा प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रशासनाची साथ अत्यंत आवश्यक असते. 'पुस्तकांचं गाव' म्हणजे शासनाच्या अनेक योजनांपैकी एक अशी योजना नव्हती, जरा वेगळा प्रकार होतोय म्हणून पुस्तकांची आणि वाचनाची विशेष आवड असलेला अधिकारी हवा होता. वाचनाची आवड असणारे, मराठी साहित्याविषयी आस्था असणारे आणि आय.ए.एस.च्या परीक्षेचे सर्व पेपर्स मुद्दाम मराठी भाषेत लिहून आय.ए.एस. झालेल्या भूषण गगराणी यांचे नाव त्यांच्यासमोर आले. त्यांच्या कार्यक्षमतेमुळेच आपल्या कल्पनेमधलं 'पुस्तकांचं गाव' त्याच्या आशयासकट प्रत्यक्षात येईल, हे लक्षात घेऊन तावडे यांनी भूषण गगराणी यांची निवड केली. गगराणी आणि त्यांच्या सहकारी अधिकाऱ्यांनी 'पुस्तकांचं गावं' प्रत्यक्षात उतरवण्यासाठी मोलाची भूमिका बजावली.

**गावाची निवड :** प्रकल्पासाठी गाव निवडणे, ही साधीसोपी गोष्ट नव्हती. निकष मात्र नक्की होते. त्या आधारे महाबळेश्वरजवळच्या भिलार या निसर्गसंपन्न आणि स्ट्रॉबेरीसाठी प्रसिद्ध असणाऱ्या गावाची निवड केली गेली. एकतर हे गाव महाराष्ट्रातील सर्वाधिक पर्यटक येतात, अशा परिसरातील आहे. दुसरे म्हणजे गावात राहण्याच्या आणि भोजनाच्या सोयीसुविधा आहेत. तिसरे म्हणजे गाव शासनाच्या विविध योजनांमध्ये निर्मलग्राम, तंटामुक्त अभियान इत्यादी आघाडीवर असते, गावाला निसर्गाचा समृद्ध वारसाही लाभलेला आहे आणि मुख्य म्हणजे या प्रकल्पासाठी गावाने घेतलेला पुढाकार आणि सहकार वाखाणण्याजोगा आहे. ग्रामसभेचा एकमताने पाठिंबा, प्रकल्पासाठी दिलेली जागा, स्वातंत्र्य चळवळीतील गावाचा सहभाग, स्वच्छतेचा आग्रह, शासकीय योजनांमध्ये सहभागी होण्यासाठीचा ग्रामपंचायतीचा पुढाकार, या प्रकल्पाबाबत गावकऱ्यांची उत्साही भूमिका या सर्व घटकांचा विचार करून, या प्रकल्पासाठी महाबळेश्वर तालुक्यातील भिलार या गावाची निवड करण्यात आली.

**संकल्पनेचे भारतीयीकरण :** ही संकल्पना जशीच्या तशी आयात केलेली नाही. या मूळ संकल्पनेला भारतीय रूप देण्यात आलेले आहे. 'हे ऑन वे' हे मुख्यत: प्रकाशकांनी व्यवसाय केंद्रबिंदू ठेवून उभे केलेले गाव आहे. येथे मात्र लोकांमध्ये वाचनसंस्कृती रुजावी, ही प्रेरणा आहे. येथे १८ घरे, ३ हॉटेले आणि ४ सार्वजनिक जागा अशा २५ स्थानांमध्ये कथा, कादंबरी, कविता, चरित्र–आत्मचरित्र अशा रूढ साहित्यप्रकारां–सोबतच विज्ञान, क्रीडा, नियतकालिके, विविध कलांविषयक, परिवर्तन चळवळ, निसर्ग–पर्यटन–पर्यावरण, दिवाळी अंक, लोकसाहित्य, मराठी भाषा व संस्कृती आणि शिवकालीन इतिहास अशा वैविध्यपूर्ण साहित्यप्रकारांची विविध घरांत मेजवानी आहे. पुस्तके वाचण्यासाठी या घरांमध्ये दिवसभर बसता येईल, अशी व्यवस्था आहे. 'अतिथी देवो भव' या सुभाषिताचा महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात दिसणारा साक्षात्कार आहे. या घरांपैकी १२ घरांमध्ये राहण्याची सशुल्क व्यवस्था आहे. अनेक घरांत चहा, कॉफी, न्याहारी, भोजनाची अल्पदरात व्यवस्था आहे. खास वाचनासाठी आलेल्या वाचकाला निर्विघ्नपणे वाचता यावे, अशी सोय आहे तर आकर्षक कपाटे, पुस्तकमांडणी, टेबल, खुर्ची, टिपॉय, बोधचिन्ह असलेली छत्री, बीन बॅग इ. साधनांमुळे, सहज फिरण्यासाठी आलेल्या पर्यटकाला वाचनाकडे खेचून घेण्याची व्यवस्था आहे.

**सजावट :** प्रकल्पाच्या उद्दिष्टांना अनुरूप दृश्यात्मकता प्राप्त करण्यासाठी ठाणे येथील 'स्वत्व' या स्वयंसेवी समूहाच्या एकूण ७५ स्वयंसेवकांच्या गटाने दि. १४, १५ व १६ एप्रिल, २०१७ रोजी सुमारे १०,००० चौ. मी. भिंतीवर अथकपणे भित्तिचित्रे रंगवून देखणी सजावट केली. ठाणे, मुंबई, नवी मुंबई, पुणे, वाई, सातारा, इंदूर अशा विविध ठिकाणांहून हे चित्रकार या उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. यांमध्ये कला महाविद्यालयांतील आजी–माजी प्राध्यापक, आजी–माजी विद्यार्थी आणि हौशी कलाकार सहभागी होते. ह्या सर्जनशील कामात, गावातील आबालवृद्धांचा सक्रिय सहभाग, कलाकार व ग्रामस्थ यांच्यामध्ये मैत्री आणि कलाकारांना घराघरांमधून चहा, न्याहारी, भोजन व निवासाची व्यवस्था असे विशेष प्रसंग या काळात भिलार–मध्ये घडले. सुप्रसिद्ध एशियन पेन्टस् या आस्थापनेने या कामासाठी सवलतीच्या दरामध्ये रंग उपलब्ध करून दिले.

**पुस्तकांची निवड :** नामवंत लेखक, प्राध्यापक, ग्रंथपाल इत्यादींचा समावेश असलेल्या समितीने, पुस्तकांची निवड करण्यासाठी वेळोवेळी बैठका घेतल्या. बैठकांमध्ये उपलब्ध प्रकाशन सूच्यांच्या आधारे पुस्तके निवडण्यात आली. प्रत्यक्ष पुस्तके पाहिल्यानंतर अधिक नेमक्या आणि व्यापक पद्धतीने पुस्तक निवड होऊ शकते, हे लक्षात घेऊन थेट प्रकाशकांकडे जाऊन पुस्तकांची निवड करण्यात आली. या निमित्ताने मराठी प्रकाशकांचं कौतुक केलं पाहिजे. त्यांनी आपल्या प्रकाशनांची पुस्तकं जास्तीतजास्त सवलतीत उपलब्ध करून दिली. त्यामुळे प्रकल्पाचा खर्चही कमी झाला.

**घरांचे ग्रंथालयांत रूपांतर :** पुस्तकांचे वर्गीकरण झाल्यानंतर व विविध साहित्याचा पुरवठा झाल्यानंतर प्रकल्पात सहभागी घरे व सार्वजनिक ठिकाणे येथे साहित्यप्रकारनिहाय पुस्तकांचे वाटप करण्यात आले. प्रत्येक ठिकाणी अत्यंत कल्पकतेने आणि अभिनव पद्धतीने पुस्तकांची मांडणी करण्यात आली. सुमारे ३५० ते ७०० अशा संख्येने पुस्तके ठेवण्यात आली. प्रथम टप्प्यात एकूण १५,००० पुस्तके वाचकांसाठी उपलब्ध करण्यात आली. या प्रकल्पात २५ ठिकाणचे ग्रंथालयांत रूपांतर करण्यात आले. अशा प्रकारे संपूर्ण गावाचेच एका मोठ्या सार्वजनिक ग्रंथालयात रूपांतर झाले आहे.

**साहित्यिक प्रदर्शनी व भाषिक खेळ :** काही सार्वजनिक ठिकाणी मराठी साहित्यविश्वातील सुमारे ५० सुप्रसिद्ध साहित्यिकांची माहिती देणारे कायमस्वरूपी प्रदर्शन फलकांच्या साहाय्याने मांडण्यात आल आहे. त्याचबरोबर मराठी शब्द–हौशी हा भाषिक खेळही खास विकसित





करण्यात आला आहे. या गावात शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सहली येतील हे गृहीत धरून विविध भाषिक खेळांतून त्यांची भाषिक क्षमता वाढवण्याचे प्रयत्नही करतो आहोत.

**लोकार्पण :** दिनांक ४ मे, २०१७ रोजी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते देशातील या पहिल्या पुस्तकांच्या गावाचे लोकार्पण करण्यात आले. देशातील पहिलं 'पुस्तकांचं गाव' आपल्या महाराष्ट्रात उभे राहते आहे, याचा अभिमान आपल्याला वाटतो, असे ते म्हणाले. येथे विविध साहित्यिक उपक्रम आयोजित होतील, उत्तम वाचक आणि लेखक यांच्या एकत्रीकरणाचे हे श्रद्धास्थान व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. प्रकल्पाच्या उद्घाटनापूर्वीच विविध वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या आणि नियतकालिके यांनी ही अभिनव कल्पना लाखो लोकांपर्यंत पोहोचवली. समाज-प्रसारमाध्यमांवरही असंख्य लोकांनी या प्रकल्पाचा उत्स्फूर्तपणे प्रसार केला.

**आगामी दिशा :** आगामी काळात मराठीतली सर्वच्या सर्व दर्जेदार आणि वाचनीय पुस्तकं तिथे असावीत, असा आमचा प्रयत्न असणार आहे. त्याचबरोबर ज्ञानपीठ आणि साहित्य अकादमी पुरस्कारांनी सन्मानित सर्व भारतीय लेखकांची पुस्तकं तिथे वाचकांना उपलब्ध होतील. इतकंच नाही, तर जगात सर्वोत्तम मानली गेलेली इंग्रजीप्रमाणेच अन्य भारतीय भाषांतील पुस्तकंही येथे असतील. वाचनातून माणूस समृद्ध होतो असा सकस अनुभव देणारं हे गाव असेल. सध्या पाचगणी, महाबळेश्वरला पर्यटनाला येणारे पर्यटक या गावाला भेट देत आहेत. भविष्यात पुस्तकांच्या गावासाठी लोक तिथे येतील. ग्रामस्थांनी गावठणाच्या मालकीची सुमारे ३ एकर जागा या उपक्रमासाठी दिली आहे. या जागेमध्ये लवकरच एक ॲम्फी थिएटर बांधले जाणार आहे. हे थिएटर म्हणजे वाचन-संस्कृतीचा विलोभनीय आविष्कार असेल. तेथे व्यंकटेश माडगूळकर, जी.ए. कुलकर्णी किंवा पु.ल. देशपांडे यांसारख्या विविध मान्यवर साहित्यिकांचे महोत्सव होतील. नुकताच १६ सप्टेंबरला विंदा करंदीकर यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने विशेष कार्यक्रम झाला. जेव्हा एखाद्या लेखकाचा महोत्सव असेल, तेव्हा त्याची सर्व पुस्तकं तिथे उपलब्ध असतील. त्याच्या लेखनावर तिथे चर्चा होतील. वाचक स्वतःचे अनुभव सांगतील. शिवाय एखाद्या पुस्तकावर चित्रपट निघाला असेल, तर त्या पुस्तकाचं प्रकट वाचन आणि त्या चित्रपटाचं सादरीकरण एकाच दिवशी होईल. किंवा एखाद्या पुस्तकावर नाटक आलं असेल तर त्या नाटकातला प्रवेश सादर होईल. याच्या जोडीने या एम्फी थिएटरमध्ये काव्यवाचनाचे कार्यक्रम होतील. नव्या पुस्तकांवर चर्चा होतील. वाचकांच्या भेटीसाठी मान्यवर साहित्यिकांची उपस्थिती असेल. शिवाय हे कार्यक्रम कधी आणि कशा प्रकारे सादर होतील याचं वर्षाचं वेळापत्रक असेल. ते वर्षाच्या सुरुवातीलाच जाहीर होईल. म्हणजे आपल्या आवडत्या लेखकांच्या कार्यक्रमांना हजेरी लावण्यासाठी वाचक आवर्जून पुस्तकांच्या गावी पोहोचतील. पुस्तकांचा हा गाव गजबजून जाईल.

या गावाचं उद्घाटन झाल्यानंतर ज्या उत्स्फूर्तपणे महाराष्ट्राने त्याचं स्वागत केलं, ते पाहून विशेष आनंद झाला आहे. पहिल्या दोन-तीन दिवसांतच शरद पवारसाहेबांनी या गावाला भेट दिली. त्यांनी प्रत्येक घरात जाऊन पुस्तकं चाळली, गावकऱ्यांशी चर्चा केली. आपल्याला ही कल्पना आणि त्याचं सादरीकरण आवडल्याचं त्यांनी जाहीरपणे बोलून दाखवलं व या गावाला दहा लाख रुपयांची पुस्तकं भेट द्या, असं त्यांनी रयत शिक्षण संस्थेला सांगितलं आहे. द. मा. मिरासदारांसारख्या साहित्यिकाने स्वतःच्या संग्रहातली पुस्तकं या गावासाठी पाठवून दिली, तर बदलापूरचे प्रसिद्ध पुस्तकप्रेमी श्याम जोशी यांनी या प्रकल्पात प्रत्यक्ष उपस्थित राहून सहकार्य करण्याचं आश्वासन पाळलं आहे. पुढच्या वर्षभरात ते भिलारमधील ग्रामस्थांना ग्रंथालय व्यवस्थापनाचं प्रशिक्षण देणार आहेत. कारण पुस्तकं कशी हाताळायची, वाचकाला हवं असलेलं पुस्तक पटकन कसं काढून द्यायचं किंवा पुस्तकांच्या नोंदी कशा ठेवायच्या, या गोष्टी शिकवण्याची गरज आहे.

या पार्श्वभूमीवर, आम्ही जगभरातील वाचकांना आणि पर्यटकांना भिलारला येण्याचं आग्रही निमंत्रण देतो आहोत. या गावाने एक वेगळीच दिशा दाखवलेली आहे. एका आगळ्या स्वप्नपूर्तीचा आनंद दिला आहे. आपल्या महाराष्ट्राचे हे आगळेवेगळे वैशिष्ट्य 'पुस्तकांचं गाव'! प्रत्येकाने पाहायलाच हवे, असे हे 'पुस्तकांचं गाव'!

(आनन्द काटीकर, प्रभारी संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई. भिलार कार्यालय संपर्क : ०२१६८-२५०१११)

PMKVY
प्रधानमंत्री कौशल विकास योजना



# प्रधानमंत्री कौशल विकास योजना

प्रधानमंत्री कौशल विकास योजना केन्द्र सरकार की फ्लैगशिप योजनाओं में से एक है। यह कौशल विकास एवं उद्यमता मंत्रालय की ओरसे चलाई जाती है। इस स्कीम का उद्देश्य है देश के युवाओं को उद्योगों से जुड़ी ट्रेनिंग देना, जिससे उन्हें रोजगार पाने में मदद मिल सके. इसमें ट्रेनिंग की फीस सरकार खुद भुगतान करती है। सरकार इस स्कीम के जरिये कम पढ़े लिखे या १०वीं, १२वीं कक्षा ड्राप आउट (बीच में स्कूल छोड़ने वाले) युवाओं को कौशल प्रशिक्षिण देती है. सरकार ने २०२० तक एक करोड़ युवाओं को कौशल प्रशिक्षण देने का लक्ष्य रखा है।

प्रधानमंत्री कौशल विकास योजना में आवेदक को अपना नामांकन कराना जरूरी होता है। इसके लिए http://pmkvyofficial.org पर जाकर अपना नाम, पता और ईमेल आदि जानकारी भरनी होती है. फार्म भरने के बाद आवेदक जिस तकनीकी क्षेत्र में ट्रेनिंग करना चाहता है उसे चुनना होगा। इनमें कंस्ट्रक्शन, इलेक्ट्रॉनिक्स एवं हार्डवेयर, फूड प्रोसेसिंग फर्निचर और फिटिंग, हैंडीक्रॉफ्ट, जेम्स एवं ज्वेलरी और लेदर टेक्नोलॉजी जैसे करीब ४० तकनीकी क्षेत्र दिये गए हैं। पसंदीदा तकनीकी क्षेत्र के एक अतिरिक्त तकनीकी क्षेत्र का भी चयन करना होगा. ये जानकारियां भरने के बाद अपने ट्रेनिंग सेंटर का चयन करना होगा।

### प्रधानमंत्री कौशल विकास योजना की ५ खास बातें

१–प्रधानमंत्री कौशल विकास योजना के लिए कोई फीस नहीं चुकानी पड़ती है, बल्कि बतौर पुरस्कार राशि करीब ८००० रुपये सरकार देती है।

२–इस स्कीम में ३ महीने, ६ महीने और १ साल के लिए रजिस्ट्रेशन होता है. कोर्स पूरा करने के बाद ही सर्टिफिकेट दिया जाएगा. यह सर्टिफिकेट पूरे देश में मान्य होगा।

३–प्रधानमंत्री कौशल योजना में ट्रेनिंग करने के बाद सरकार आर्थिक सहायता करने के साथ नौकरी दिलाने में भी मदद करती है. रोजगार मेलों के जरिए सरकार ऐसे युवाओं को नौकरी दिलाने में मदद करती है।


४–इस योजना का उद्देश्य ऐसे लोगों को रोजगार मुहैया कराना है जोकि कम पढ़े लिखे हैं या बीच में स्कूल छोड़ देते हैं।

५–अपने पाठ्यक्रम के पूरा होने पर आपका SSC द्वारा स्वीकृत मूल्यांकन एजेंसी द्वारा मूल्यांकन किया जाएगा। यदि आप मूल्यांकन पास कर लेते हैं और आपके पास वैध आधार कार्ड है, तो आपको सरकारी प्रमाणपत्र तथा स्किल कार्ड प्राप्त होगा। उम्मीदवार कई बार अपना मूल्यांकन करवा सकते हैं, पर उन्हें हर बार मूल्यांकन शुल्क भरना होगा।



यदा यदा हि भाषाया: ग्लानिर्भवति संस्कृते: ।
अभयुत्थानं अनर्थस्य तदा 'पांथस्थ' सम्भव: ।।

# कुरुक्षेत्र !



– रवींद्र गुर्जर

अल्डस हक्सले या विचारवंताचा एक निबंध महाविद्यालयात आमच्या अभ्यासाला होता. World Government or Annihilation' असे त्याचे शीर्षक होते. रशिया–अमेरिका आणि अन्य काही देशांची अण्वस्त्र निर्मिती त्यावेळी सुरू होती. त्यावर नियंत्रण कोणाचेच नव्हते. 'एखाद्या देशाच्या, माथेफिरू नेत्याच्या चुकीच्या निर्णयामुळे (सध्याचा उत्तर कोरिया बघा) जागतिक महायुद्ध होऊन जगाचा सर्वनाश ओढवेल. त्यामुळे एक जागतिक सरकार बनवले पाहिजे. सगळ्या देशांचे प्रतिनिधी त्यात असतील. महत्त्वाचे निर्णय त्यांच्यामार्फत घेतले जावेत,' असा त्या लेखाचा सारांश होता.

हे आत्ता आठवायचे कारण काय? प्रकाशन, पुस्तक विक्री, ग्रंथालयांची स्थिती, वाचन संस्कृती आदि ग्रंथ–व्यवसायाची सद्यस्थिती पाहता, आपण एका 'विनाशाच्या दिशेने' जात आहोत, अशी अवस्था आहे. काही जणांना हे चित्र स्पष्ट दिसत आहे, तर काहींना अजूनही परिस्थिती आशादायक, नियंत्रणात आहे, असे वाटते. दोन मराठी प्रकाशक संस्था आपापल्या कुवतीने काम करत आहेत, पण ते अत्यंत अपुरे आहे. सरकारी अनुदानाच्या आधाराने चाललेल्या सार्वजनिक ग्रंथालयांच्या पुस्तक–खरेदीवर सर्वांची मुख्य भिस्त आहे. ती खरेदी, किंवा पुस्तकांची निवड कुठल्या पद्धतीने चालते, ते सर्वज्ञात आहे. अतिदक्षता विभागात रुग्णाला 'व्हेंटिलेटर'वर जिवंत ठेवतात, तशी अवस्था मराठी ग्रंथ–व्यवसायाची झाली आहे. कसे ते बघू या.

पुस्तक प्रदर्शने जवळजवळ बंद पडली आहेत. दुकाने एकेक करून त्याच मार्गावर आहेत. काही लेखक वगळता, पुस्तकांची आवृत्ती ५०० प्रतींवर आली आहे. वृत्तपत्रांत नवीन पुस्तकांच्या जाहिराती पान–पान भरून असायच्या, त्या आता रोडावल्या आहेत. जाहिरात करणे परवडतच नाही. फेब्रुवारीत बडोद्याला झालेल्या साहित्य संमेलनातील सर्व १५० स्टॉल्सची मिळून एकूण विक्री १० लाखसुद्धा झाली नाही. आयोजकांचा त्यात काही दोष नाही. त्याची कारणे वेगळीच आहेत. बहुसंख्य मासिके बंद झालेली आहेत. मोठमोठे प्रकाशक लेखकांकडून पैसे घेऊन पुस्तके छापतात. साहित्यिक कार्यक्रमांना उपस्थिती अत्यंत कमी असते. इतके सगळे असूनही परिस्थिती 'हाताबाहेर गेलेली नाही' असे म्हणता येईल का?

अर्थात, हे सर्व कथा–कादंबऱ्या आणि ललित वाङ्मयाला लागू आहे. धार्मिक, व्यक्तिमत्त्व विकास, आहार, व्यवस्थापन, आरोग्य इ. विषयांवरील पुस्तके चांगली चालतात. याचा अर्थ, प्रकाशनाचे धोरण आता बदलले पाहिजे. युरोप–अमेरिकेत प्रचंड विषयवैविध्य आहे. त्यांचे अनुवाद मराठीत होऊ शकतात. ई–बुक्स, डिजिटल आवृत्ती, प्रिंट ऑन डिमांड (हव्या तेवढ्याच प्रती छापणे, म्हणजे ५० ते २००), वाचकांपर्यंत पोचण्याचे नवनवे मार्ग शोधणे, तरूण वर्गाला आकर्षित करणे, असे उपाय संघटित/सहकारी तत्त्वावर व्यापक प्रमाणात अंमलात आणणे ही काळाची गरज आहे. ई–मेल, व्हॉट्सऍप, फेसबुक इ. अनेक माध्यमे आज प्रभावी ठरत आहेत. त्यांचा चांगला उपयोगही होताना दिसतो. परंतु त्यासाठी आपण एकत्र येण्याचा विशाल दृष्टिकोन ठेवणार का?

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याची चिन्हे दिसत नाहीत. मराठीसाठी स्वतंत्र विद्यापीठ नाही. चीन–जपानसारखे, विज्ञान/तंत्रज्ञान आपल्या मातृभाषेत आले पाहिजे. त्या कामाला प्राधान्य दिले पाहिजे. त्यासाठी तज्ज्ञांची कमतरता नाही. त्याचा पाठपुरावा मात्र झाला पाहिजे. युद्धकाळात जसा सगळा देश एक होतो आणि एकदिलाने कोणत्याही मदतीला सज्ज होतो, त्याप्रमाणे मराठीच्या विकासासाठी (आणीबाणीची परिस्थिती आहे हे लक्षात घेऊन) सर्व मराठी संस्थांनी एकत्र आले पाहिजे. हे काम सहजसाध्य नाही. नेतृत्व कोणी करायचे, हा प्रश्न घेणारच. त्यासाठी दूरदृष्टीचे नियोजन आणि आर्थिक उभारणीसाठी एक मध्यवर्ती संस्था आणि देशविदेशात विभागीय कार्यालये असली पाहिजेत. वर्षानुवर्षे, आपापल्या परीने काम करणाऱ्या संस्थांचा त्यात अंतर्भाव असेलच.

प्रत्येक संस्थेचे काम निरनिराळ्या स्वरुपाचे असेल/असते. भाषाविषयक अभ्यासक्रम, चर्चासत्रे, सभा–संमेलने, मुलाखती, पुस्तक प्रकाशन, स्वत:चे नियतकालिक–ही यादी खूप मोठी होऊ शकेल. आर्थिक नियोजन ज्याचे त्याने बघितले पाहिजे. त्यात, आजीव सदस्य, प्रायोजक व देणगीदार आणि जाहिरातदार येतात. मध्यवर्ती संस्थेकडे कायमस्वरुपी मोठा निधी (२५ कोटी किमान) असला पाहिजे. त्याचा विनियोग एक मोठे संदर्भ

ग्रंथालय, दुर्मिळ पुस्तकांचे प्रकाशन, निवडक विषयांवर संशोधन करण्यासाठी शिष्यवृत्ती देणे आणि कोश व सूची यांची निर्मिती इ. कामांवर होईल. हा महाकोष निर्माण करण्यासाठी विशेष प्रयत्नांची आवश्यकता आहे. त्यातून संलग्न संस्थांनाही त्यांच्या सहभागानुसार आणि प्राधान्यक्रमाने मदत होऊ शकेल.

'विश्व पांथस्थ' हे मासिक नुकतेच (प्रामुख्याने) अनिवासी भारतीयांसाठी सुरू झालेले आहे. तथापि, महाराष्ट्रासह भारतामधील अन्य राज्ये आणि जगभरातील मराठी/अमराठी लोकांनाही ते उपयुक्त ठरणार आहे. अंकामध्ये, आपण 'पांथस्थ'साठी काय करू शकता, ते सविस्तर दिलेले आहे. 'अमृतातेही पैजा जिंकणाऱ्या' मराठी भाषेच्या उत्कर्षासाठीही हे मासिक काम करील. भाषा, संस्कृती, कला, संगीत, नाट्य–चित्र या सर्व क्षेत्रांचा परामर्ष येथे घेतला जाईल. परदेशस्थ लोकांनी, विशेषत: बालकुमार वयांतील मुलांचा विचार करून त्यांच्या 'पांथस्थ'कडून काय अपेक्षा राहतील, ते अवश्य कळवावे. त्याशिवाय आपल्या संस्थांची सदस्यांसह सविस्तर माहिती पाठवावी. हा अंक अत्यंत अल्प दरात लाखो लोकांपर्यंत कसा पोचवता येईल, याचा विचार चालू आहे. त्यासाठी आपले सहकार्य अपेक्षित आहे.

लेखाच्या सुरुवातीला लिहिल्याप्रमाणे, तिसऱ्या महायुद्धाचा धोका (सर्वनाश) टाळण्यासाठी 'जागतिक सरकार' स्थापन होणे आवश्यक आहे. अर्थात ती आज तरी अशक्य कोटीतली गोष्ट आहे. निदान, भाषा– संस्कृतीसाठी जागतिक स्तरावरील एक संस्था उभी राहावी. एकापेक्षा अधिक निर्माण झाल्यास त्यांचे स्वागतच आहे. तेव्हा साहित्य संस्थाधीशांनो आपल्या रथी–महारथींसह त्वरित रणांगणावर उतरा!

'पांथस्थ' नक्कीच त्या दिशेने पावले उचलत आहे.

**मोबाईल/व्हॉटसअप : ९८२३३२३३७०**

प्रिय अनिवासी मराठी भारतीय,

पांथस्थ हे मासिक खास तुमच्यासाठी सुरु केले आहे. जगभर, विशेषतः आखातामध्ये वितरित होणारे अशा प्रकारचे हे पहिलेच मासिक आहे. आखातात किती मराठी मंडळी आहेत, किंवा जगभर किती मराठी मंडळी वास्तव्य करत आहेत याचा अंदाज घेण्यासाठी आता पांथस्थतर्फे आपण सर्वांची माहिती गोळा करण्याचे ठरवले आहे. फक्त संयुक्त अरब अमिरातीमध्ये २ लाख मराठी भारतीय असावेत असा अंदाज आहे. त्यांच्या विविध गरजा आहेत, मते आहेत. पांथस्थ ने हा उपक्रम त्यांच्यासाठीच चालू केला आहे. आपली माहिती येथे भरून द्या म्हणजे आम्हाला या माहितीचे सविस्तर विश्लेषण करता येईल. रजिस्ट्रेशन केलेल्या सदस्यांची मोजकीच माहिती www.panthasta.com या वेब साईटवर तुम्हाला बघता येईल. तुम्ही या वेब साईटवर जाऊन तुमच्या मित्र परिवाराची देखील माहिती ऑन लाईन भरू शकता. माहिती खरी व सध्याची असावी. या द्वारे मग आम्ही तुमच्याशी संपर्क करून विविध उपक्रमांबद्दल, काही जरूरी विषयांबद्दल तुम्हाला माहिती देऊ शकतो तसेच तुमचे विविध विषयांवर मत जाणून घेऊ शकतो. तेव्हा या उपक्रमात नक्कीच सामील व्हा व पांथस्थ परिवाराचा एक सदस्य म्हणून कार्यरत व्हा. तुमच्या सहकार्यासाठी अनेक धन्यवाद.

**- editor@panthastha.com**

मंदार प्रिंटर्स
HOUSE OF GOVT. FORMS
Shop No. 2, 756 Kasba Peth, Opp. Sat-toti Police Chowky, Pune - 411 011.
Tel. : 020-24576142, 24578942 Email : mandarprinters@gmail.com



# एमिरेट्स एअरलाईन फेस्टिव्हल ऑफ लिटरेचर

## दहा वर्षांची यशस्वी वाटचाल

– प्रचिती तलाठी गांधी

२०१३ मध्ये वकिलाच्या ऑफिसमधील नोकरी सोडली, आणि 'आता पुढे काय?' असा विचार करत असताना मी फेसबुकवर 'Emirates Airline Festival of Literature' ला काही स्वयंसेवक हवे असल्याची बातमी वाचली. ही जाहिरात म्हणजे माझ्यासारख्या पुस्तकवेड्या माणसासाठी सुवर्णसंधी होती. लगेच योग्य तो फॉर्म भरून टाकला आणि २०१३ च्या मार्च महिन्यात दुबई या जादुई नगरीशी माझी पहिली ओळख झाली. तिथेच मनाशी ठरवले की याच संस्थेत आपल्याला नोकरी मिळवायची.

मी हट्टाने त्यांच्या मागे लागले नोकरी देण्यासाठी, अगदी फुकट काम करायची पण तयारी दाखवली. मग काय, त्या जादुई नगरीचे दरवाजे माझ्यासाठी उघडले गेले. माझा प्रवेश झाला तो एक मदतनीस म्हणून. कुणालाही काही जादाचे काम द्यायचे असेल तर ते मला सांगत. मला कधीच कुठलेही काम करायची लाज नाही वाटली. मी प्रामाणिकपणे काम करत गेले आणि मग माझी नोकरी तिथे पक्की झाली. नोकरी पक्की झाल्यानंतर हे 'सहित्य' संमेलन कसे चालते, त्याची पडद्यामागची तयारी कशी असते, हे जवळून बघायला मिळाले. आज तुम्हाला त्याबद्दल थोडे सांगणार आहे.

हे संमेलन १० दिवस चालते. आधी ५ दिवस चालायचे, पण आता लोकांच्या सोयीसाठी कालावधी वाढवला आहे. या संमेलनासाठी जगभरातून साधारण १३० पेक्षा जास्त लेखक येतात. त्यांची २००च्या आसपास सत्रे होतात. काही परिसंवाद, कार्यशाळासुद्धा असतात. या संमेलनाला साधारण ५०,००० लोक भेट देतात आणि २८,००० विद्यार्थी सहभागी होतात. विद्यार्थ्यांसाठी काही स्पर्धा होतात. त्यांच्यातील लेखक आणि कवींना प्रोत्साहन दिले जाते. हा सगळा डोलारा सांभाळायला आणि यशस्वीपणे पार पडायला साधारण १५ ते २० लोक वर्षभर काम करतात आणि संमेलनाच्या काळात किमान ६०० स्वयंसेवक मदतीला येतात.

Emirates Airline Festival of Literature (EAFOL) ही संस्था Emirates Literature Foundation चा एक भाग आहे. EAFOL मध्ये कम्युनिकेशन, ऑपरेशन, प्रोग्रामिंग आणि शैक्षणिक असे चार महत्त्वाचे विभाग येतात. या विभागांबद्दल आणि त्यांच्या कामाबद्दल थोडे जाणून घेऊ.

सगळ्यात प्रथम बघू प्रोग्रामिंग विभाग. या विभागाचे काम असते देश-विदेशातील लेखकांशी संपर्क साधणे, त्यांना या संमेलनाबद्दल सांगणे आणि त्यांना या संमेलनाला बोलावणे. काही मोठ्या लेखकांची तर तारीख १ वर्ष आधीपासून घ्यावी लागते. एकदा सगळे लेखक नक्की झाले की त्यांची विमानाची तिकिटे काढणे, राहायची सोय करणे हे एक काम, तर त्यांच्या इथल्या कार्यक्रमाची रूपरेषा ठरवणे हे दुसरे काम. इथे आल्यावर लेखक नुसते त्यांचे सत्र नाही करत तर त्यांना इथे 'दुबई-दर्शन' सुद्धा घडवले जाते. आणि हो! हे सगळे लेखक या संमेलनाला येण्यासाठी काहीही मानधन घेत नाहीत. लेखक इथे आल्यावर संमेलनाच्या काळात लेखकांच्या भेटी-गाठींसाठी एक वेगळा कक्ष असतो. त्याला आम्ही ग्रीन-रूम म्हणतो. ती सुद्धा जबाबदारी या विभागाची असते. या ग्रीन-रूममध्ये लेखकांना एकमेकांशी बोलता येते, नवीन ओळखी वाढवता येतात, तसेच त्यांच्या सर्व प्रश्नांची उत्तरे इथे मिळतात.

दुसरा विभाग आहे शैक्षणिक विभाग. या विभागाचे काम असते वेगवेगळ्या शाळांशी संपर्क करणे. त्यांना या संमेलनाची आणि विद्यार्थ्यांसाठी असलेल्या स्पर्धांची माहिती देणे. हा विभाग संपूर्ण देशातील शाळांशी संपर्क करतो. विद्यार्थ्यांच्या विविध वयोगटासाठी लघुकथा आणि कवितांची एक स्पर्धा असते. प्रत्येक गटातून ३ स्पर्धक विजयी होतात. विजेत्यांचे साहित्य पुस्तकात छापले जाते. दुसरी स्पर्धा होते ती वाचकांसाठी. विद्यार्थ्यांना त्यांच्या वयोगटानुसार वाचनासाठी चांगल्या लेखकांचे एक पुस्तक सुचवले जाते, आणि त्यावर प्रश्न विचारले जातात. या विभागाकडे अजून एक महत्त्वाची जबाबदारी असते ती म्हणजे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना लेखकांच्या भेटीचा लाभ घडवून आणणे; आणि म्हणून शाळांना संमेलनात घेऊन येणे किंवा लेखकांना शाळेत घेऊन जाणे ही एक जबाबदारी असते.

तिसरा विभाग आहे कम्युनिकेशन. या विभागाचे काम खूप महत्त्वाचे आहे. लोकांना या संमेलनाबद्दल सांगणे, जाहिरात करणे, पत्रकार आणि सगळ्या प्रकाराच्या मीडियामधील लोकांना लेखकांच्या मुलाखतीच्या वेळा देणे, त्याप्रमाणे वेळापत्रक बनवणे. फोटोग्राफर आणि व्हिडिओग्राफर यांना कुठले सत्र किती वाजता आहे याचे वेळापत्रक देऊन त्याप्रमाणे सर्व फोटो घेणे, हेही एक महत्त्वाचे काम असते. त्याचबरोबर सर्व सत्रांची तिकिटविक्री करण्यासाठी लागणारे सॉफ्टवेअर अद्ययावत ठेवण्याची जबाबदारीसुद्धा याच विभागाची.

सगळ्यात शेवटचा विभाग म्हणजे ऑपरेशन. या विभागाकडे संपूर्ण संमेलन सुरळीत पार पाडायची जबाबदारी असते. बस! या एका वाक्यात या विभागाची जबाबदारी संपते; पण खरं तर हा विभाग म्हणजे पाया आहे या संमेलनाचा. काहीही कमीजास्त झाले तर जबाबदारी या विभागाची असते. काही चुकले तरी लोकांना कळू न देता ती चूक सुधारणे, हे या विभागाचे कौशल्य आहे. मी ५ वर्षे याच विभागात काम केले. कधी कधी तर एखाद्या मोठ्या लेखकाच्या सत्रासाठी एकावेळी ४००-४५० लोक येतात आणि नंतर त्या लेखकाची पुस्तकावर सही घेण्यासाठी रांगेत २-३ तास उभे राहतात. अशा वेळी कुठेही गडबड गोंधळ न होता हे सर्व पार पडणे मोठ्या जबाबदारीचे काम असते. या सर्वांबरोबरच ६०० स्वयंसेवकांची नोंदणी करणे, त्यांना जबाबदाऱ्या वाटून देणे, आणि प्रत्येक ठिकाणी स्वयंसेवक असतील याची व्यवस्था बघणे, हे यांचे काम असते. या विभागात काम करायचे म्हणजे डोक्यावर बर्फ आणि जिभेवर साखर ठेवावी लागते. कितीही ताणतणाव असला तरी चेहऱ्यावर मंद हास्य असणे अत्यंत गरजेचे असते. अर्थात त्यामुळे निम्मा ताण कमी होतो.

EAFOLची संपूर्ण टीम वर्षभर याच १० दिवसांसाठी काम करत असते आणि म्हणूनच सलग तीन वर्षे या संमेलनाला 'Best Festival of the Middle East'चे पारितोषिक मिळाले आहे. या दहा दिवसात सर्व टीम अव्याहतपणे, अगदी न झोपता म्हटले तरी चालेल, काम करते. 'जिथे कमी तिथे आम्ही' हे ऑपरेशन टीमचे ब्रीदवाक्य असते.

या टीमबरोबर काम करताना मला खूप काही शिकायला मिळाले. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे दिलेला शब्द पाळणे, कामामधील व्यावसायिकता (Professionalism), कुठेही आप-पर भाव नाही आणि वशिलेबाजी नाही. सर्वांना एकत्र घेऊन काम करणे आणि अत्यंत बारीकीने नियोजन करणे. टीममधील प्रत्येक जण एक एक पैसा जपून खर्च करतो. या संमेलनासाठी अनेक प्रायोजक आहेत, ज्यांच्या सहकार्यामुळे हे सर्व सहज शक्य होते. 'मला काय करायचे आहे! हे माझे काम नाही!' अशी वृत्ती इथे काम करताना ठेवून चालत नाही. तुम्हाला काही त्रुटी दिसली तर लगेच ती सुधारायला योग्य त्या माणसाला विचारणे अथवा स्वतः सुधारणे असे दोनच पर्याय तुमच्यासमोर असतात.

आपल्याला यातून खूप काही शिकण्यासारखे आहे. आपल्याकडे सुद्धा आंतरराष्ट्रीय स्तरावर अशी माझ्या माहितीत दोन संमेलने होतात, एक मुंबईला होते - Mumbai LitFest आणि दुसरे म्हणजे Jaipur LitFest. जयपूरला होणारे संमेलन तर आशियामधील पाचव्या क्रमांकाचे मोठे संमेलन आहे. जे दुबईत असतात त्यांना यासाठी स्वयंसेवक म्हणून काम करता येते. अधिक माहितीसाठी www.emirateslitfest.com या वेबसाईट ला भेट अवश्य द्या.

२०१८ चा मार्च महिना 'UAE Month of Reading' म्हणून साजरा झाला. संमेलनाचे हे १० वे वर्ष होते.

- prachititalathi@gmail.com



# सण

सण म्हणजे आमच्या मनातील सलणारी जखम
टोचते, ओरबडते आमच्या भावनांना
रक्तबंबाळ करते निळ्या वस्त्रातील या मनांना

सण येतात पण लेबर कॅम्पकडे पाठ फिरवून जातात
या उजळून टाकणाऱ्या प्रकाशमान कॅम्पमध्ये
चेहरे मात्र आपल्या भूतकाळातील
सणासुदीला आठवत टिपं गाळत बसतात

सण रडवतात आमच्यातल्या कणखर पुरुषांनाही
सासुरवाशीण पोरी सारखं खुणावतात आम्हाला

सिंधू सागराच्या पैलतीरावरील आमच्या माहेराला
मायेने दोन घास भरवणाऱ्या माहेरच्या माणसांना

सण मारत असतात फुंकर आमच्या मनातील धगीवर
आतल्या निखाऱ्यांना टरारुन फुलवत पेटवून देतात आम्हाला
बाहेरच्या उष्णतेने आणि आतल्या आगीने
बाष्पीभवन होत राहत आमच्या डोळ्यातील टिपांचं

सण म्हणजे लेबर कॅम्पमध्ये असतो
फक्त आमच्या दुःखाचा आनंदोत्सव....

# सातशे तीस खुणा

माझ्यासाठी दोन वर्ष म्हणजे
कागदावरील सातशे तीस अंकांच्या खुणा
एका दिवसाची एक खूण...

जातील हे दिवस!
असं म्हणत जगत रहातो रोज
दुबईतल्या गगनचुंबी इमारती बांधताना
दिवस कामात निघून जातो
पण! रात्र संपता संपत नाही
दिवसभर कितीही दमलं, तरीही नाही

जमिनीवर उभ्या रहात असलेल्या
त्या गगनचुंबी इमारतीचा
एक एक मजला साकारत जाताना पहात
मी दररोज काम करत रहातो
कुणास ठाऊक?

कदाचित सर्वात वरच्या मजल्यावरून
दिसेल मला माझा गाव (?)
नाहीतर गावची हवा तरी
अनुभवेल तिथून
इमारत संपते

सर्वात वरच्या मजल्यावरून
मी कटाक्ष टाकतो पूर्वाभिमुखी होऊन
पण क्षितिजानंतर
धुक्याने काहीच दिसत नाही

मी निराश होत नाही कारण, उद्या याहूनही उंच
इमारतीचे काम सुरू होणार आहे

मग, घामाने भिजलेले ते निळे कपडे
आणि हातात पिवळे हेलमेट घेऊन
मी निघतो कॅम्पकडे रात्र घालवण्यासाठी

शेजारच्या दोन मजली खाटेच्या
खालच्या कप्प्यात जॉन आणि
वरल्या कप्प्यात अब्दुल
मारतात गप्पा कितीतरी वेळ
त्यांच्या मल्याळम भाषेत
पण मी एकटाच असतो
शेजारच्या खाटेवर सर्वात वरच्या कप्प्यात

कॅम्पमधल्या भिंतीवरचे
जॉनने लावलेले मल्याळम कॅलेंडर
नुसते फडफडते
मग मी पहात बसतो
ती न समजणारी मल्याळी वळणदार अक्षरं

झोपण्यापूर्वी कागदावर लिहिलेल्या
सातशे तीस अंकातील एक खूण
मी न चुकता खोडतो
खरं सांगू?
किती आनंद होतो मला
एक खूण कमी झाल्याचा.....



**गणेश भाऊसाहेब पोटफोडे**
(दुबई, यु ए ई)
email : gbp125@gmail.com

विश्व पांथस्थ

## FORM FOR REGISTRATION

- Name : ______
- Date of Birth: ______
- Sex: Male ☐ Female ☐
- Marital Status: Married ☐ Unmarried ☐
- Education: ______
- Profession: ______
- Mobile: ______ ______
- Email: ______
- PO Box: ______ Emirate: ______
- State: ______
- Country of Residence: ______

- How long you have been staying abroad? : ______
- How long you are staying in this country? : ______
- Which is your native place in India? : City ______ State ______
- Where do you currently stay in India, when you go for vacation? :

  City ______ State ______
- If Married, are you staying with your family abroad?: Yes ☐ No ☐
- If you are staying alone abroad, where does your family stay : ______
- Number of Children : Son ☐ Daughter ☐
- Would you like to subscribe to Vishwa Panthastha Magazine? : Yes ☐ No ☐
- Would you like to be associated with various social projects we may undertake in future? : Yes ☐ No ☐

We thank you for your providing above authentic information.

**editor@panthastha.com**

**Email: member@panthastha.com**

**PO Box 85489, Dubai**

Vishwa Panthastha - RNI CR No. MAHBIL/2016/69261




# Lets work... together... today... for a better tomorrow

Turnaround, Strategy Consulting, Project Incubation,
Vision Mission Definition Workshops, CEO Coaching,
Market Research and Feasibility Study, Business Plan and Project Reports,
Corporate and Capital Structuring, Cash Flow and Financial Reengineering,
Due Diligence and Business Valuation, Equity and Debt Syndication,
HR Training and Talent Search, Efficiency Improvement Audits
Joint Venture, M&A and Private Equity Placements

MITCON International

Management I Investment I Technology I Consulting

Email : ceo@mitcon.ae